Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018 Special Issue – 69

Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar
Assist. Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Indian Citation Index (ICI)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | नवपत्रकारिता | मनीषा मोहोड | 255 |
| 49 | पुराण साहित्य : उत्पत्ती, स्वरूप, अंतरंग | डॉ. संतोष चतुर | 258 |
| 50 | भारतातील राष्ट्रवादाचा इतिहास | डॉ. डी.एम. चौधरी | 265 |
| 51 | कीर्तन : एक संवादात्मक नाट्यप्रयोग | डॉ. सतीश चहांदे व प्रा. काशिनाथ तरासे | 268 |
| 52 | अधिकोषण व्यवस्थेतील तंत्रज्ञानाच्या बदलांचा अभ्यास | पंकज तायडे | 276 |
| 53 | १९८० नंतरच्या ग्रामीण साहित्याच्या भाषेचे बदलते स्वरूप | डॉ. रामकिशन दहिफळे | 281 |
| 54 | संत साहित्यातील मूल्यविचार | डॉ.अशोक लिंबेकर | 284 |
| 55 | आदर्श ग्राम संकल्पना | डॉ. प्रवीण कारंजकर | 289 |
| 56 | पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सामाजिक योगदान | प्रकाश पांढरमिसे | 292 |
| 57 | शोकात्म आविष्काराची संवेदनशील कलाकृती : हाल्या हाल्या दुधू दे | कु.प्रतिमा झळके | 296 |
| 58 | नेतृत्व आणि त्याचे घटक | डॉ. सुनील चकवे | 300 |
| 59 | पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक-महिला बचत गटाची अर्थवाहिनी | प्रकाश पांढरमिसे | 304 |
| 60 | महाराजा सयाजीराव यांचे वैचारिक साहित्य : एक अभ्यास | डॉ. अनिल गर्जे | 309 |
| 61 | १९६७ची सार्वत्रिक निवडणूक : एक ऐतिहासिक विश्लेषण | प्रा. एकनाथ खरात | 314 |
| 62 | झुंज : एक जीवनसंघर्ष | प्रा. लालबा दुमटकर | 319 |
| 63 | पुणे विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालयीन युवकांची आरोग्याधिष्ठीत शारीरिक सुदृढता व निरामयता स्तराचा चिकित्सक अभ्यास व मानांकन निर्मिती | सुनील पानसरे व डॉ. विनायक तुजारे | 323 |
| 64 | उच्च शिक्षण संस्थांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे उपक्रम (रेणुका कॉलेज ग्रंथालयाच्या संदर्भात ) | डॉ. रमणिक लेनगुरे | 331 |
| 65 | संत एकनाथ व त्यांची भारुडे | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 337 |
| 66 | रोहा तालुक्यातील कुणबी समाजाचे लोकजीवन | डॉ. शंकर मुंढे | 342 |
| 67 | भारतीय राज्यघटना व पर्यावरण शिक्षण | डॉ. मोहन खताळ | 348 |
| 68 | सातवाहन कालीन बौद्ध लेणी : स्त्रियांचे योगदान | डॉ. माधवी खरात | 351 |
| 69 | प्रिया तेंडुलकरच्या कथांमधून व्यक्त होणारी चिंतनशीलता | डॉ. वैशाली झोडे | 356 |
| 70 | आदिवासी लोकगीतांमधील आदिबंध | डॉ. अंजली मस्करेन्हस | 358 |
| 71 | शैक्षणिक संशोधनात माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा शिक्षकांना होणारा विविधांगी उपयोग | डॉ. पूर्णिमा वानखेडे | 366 |
| 72 | धुळे तालुक्यातील कापडणे गावातील आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या आरोग्य सेविकांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. अरविंद पाटील | 372 |
| 73 | कथाकार उद्धव शेळके यांच्या स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कथा | डॉ. जितेंद्र गिरासे | 377 |

Scanned with CamScanner

# भारतातील राष्ट्रवादचा इतिहास

डॉ. डी, एम, चौधरी
(इतिहास विभाग)
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
ता.कर्जत, जि. अहमदनगर
मो. ९७६६६२४९९५
Email-chaudhridattatray@gmail.com

राष्ट्रवाद किंवा छंजपवदंसपेंउ ही लॅटिनमधील छंजपवद म्हणजे जन्म किंवा वंश अर्थात छंजपवद. छंजपवदंसपेंउ हा शब्द प्रयोग एकाच वंशात जन्म घेतलेल्या लोकासाठी वापरला जातो.राष्ट्रीयत्व हि संकल्पना एकच वंशात जन्म घेतलेल्या परंपरा,इतिहास,संस्कृती,धर्म,भौगोलिक वस्तीस्थान समान आहे अशा लोकामध्येंच निर्माण होऊ शकते.

राष्ट्रवादाच्या निर्मिती साठी समाजात एकात्मता,पृथगामता व राजकिय स्वातंत्र्याची ओढ निर्माण होणे आवश्यक असते.अशा प्रकारची भावना निर्माण होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरतात. समान भूप्रदेश, वांशिक एकता,सांस्कृतिक एकता, इतिहास,भाषिक एकता, धार्मिक एकता, समान आर्थिक हितसंबंध, समान राजकिय महत्वकंक्षा इत्यादी घटकामुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागते.[१]

भारताता रूढी,चालीरिती ,परंपरा ,जातिव्यवस्था ,धार्मिक विविधता, सांस्कृतिक विविधता आहे. असे असले तरी १९ व्या शतकामध्ये भारतात ब्रिटीशांच्या धोरणा मुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागलेली दिसून येते.

भारतातील ब्रिटीशांची राजवट उलथून टाकण्या साठी भारतातील लोकांनी इ.स.१८५७ चा उठाव केला.पण ब्रिटीशांनी हा उठव अत्यंत निर्दयीपणे मोडून काढला.. त्या नंतर पुढील काळात ब्रिटीशांच्या विरूध्द अनेक छोटे मोठे उठाव झाले पण ब्रिटीशांनी भारतातील सर्व उठाव मोडून काढण्यात यश मिळवलेले दिसून येते. भारतातील बंड मोडून काढण्यात जरी ब्रिटीशांना यश आले तरी भारतात वाढत जाणारा असंतोष त्यांना दूर करता आला नाही. उलट भारतात ब्रिटीशांच्या धोरणा विरूध्द असंतोष वाढत राहिलेला दिसून येतो व यातूनच भारतात हळूहळू राष्ट्रवाद वाढीस लागलेला दिसून येतो.[२]

ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे , वंशभेदाच्या धोरणामुळे , ब्रिटीशांच्या पक्षपाती धोरणामुळे , फोड व झोडा धोरणामुळे ,भारतात राष्ट्रवादी भावना वाढीस लागण्यास मदत झाली.

ईस्ट इंडिया कंपनीने भारताचे आर्थिक शोषण करण्यावर भर दिला. ब्रिटीश शासनानेही देशांचे मोठया प्रमाणावर आर्थिक शोषण करून देशाला दारिद्री बनविले.उपासमारी ,बेकारी या सारखी अनेक संकटांचा सामना भारतीयांना करावा लागला.[३]

इ.स. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेतील उदारमतवादी नेत्यांनी अर्ज, विनंत्या ,निवेदन, शिष्टमंडळ या सारखी मवाळ धोरण राबविली त्यामुळे भारतीयांचे समाधान झाले नाही यातून सुध्दा भारतात राष्ट्रवाद वाढीस लागला. पुढे लॉर्ड कर्झनची दडपशाही , बंगालची फाळणी, नैर्सगिक अपत्तीकडे सरकारचे दुर्लक्ष यातूनच लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली जहाल राष्ट्रवादचा उदय झाला. ब्रिटीश सरकरचे डोके ठिकानावर आहे काय असा सवाल लोकमान्य टिळकांनी ब्रिटीश सरकारला विचारला. तसेच लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेश उत्सव सुरू करून भारतीयांच्या मनात राष्ट्रवादी भावना निर्माण केली.[४]

Scanned with CamScanner

इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना होणापुर्वी अनेक प्रातिय संघटनेचा उदय झालेला होता. लॅन्ड होल्डर्स असोसिएशन , ब्रिटीश इंडियन असोसिएशन,हिंदू पॅट्रीअट, बॉम्बे असोसिएशन , मद्रस नेटीव्ह असोसिएशन, ईस्ट इंडिया असोसिएशन, सार्वजनिक सभा, बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन , या सारख्या संघटनेनी राजकिय जागृती करण्याचे कार्य केले.[५]

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला भारतात धार्मिक व सामाजिक चळवळीचा प्रारंभ झाला. १९ व्या शतकाचा पुर्वार्ध धार्मिक,सामाजिक,राजकिय जागृतीचा महत्वपुर्ण आरंभ मानला जातो.या काळात ब्राम्होसमाज,आर्य समाज,रामकृष्ण मिशन,प्रार्थना समाज,थिऑसॉफिकल सोसायटी ,भारतीय सेवक समाज या सारख्या धार्मिक संघटनेचा उदय झाला. या संघटनेने देशातील वाईट रूढी, परंपरा,चालीरिती,अंधश्रध्दा,कर्मकांड या वर कठोर हाल्ले चढविले.राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती ,महात्मा फुले या सारख्या धर्मसुधारकांनी धर्माचे मुळ तत्वज्ञान जनते समोर ठेवले आणि आपण पाश्चमात्य संस्कृती पेक्षा मागस आव्होत हे दाखून दिले. आणि यातूनच भारतीयांच्यात स्वदेश आणि स्वसंस्कृचा अभिमान वाटू लागला.[६]

महात्मा फुले यांच्या (१८७३) सत्यशोधक समाजाने दलितोध्दारचे कार्य केले. शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या भरवस्तीत गंगाराम कांबळे सारख्या व्यक्तीला चहाची टपरी काढून देवून जातिव्यवस्थेला मुठमाती देण्याचा प्रयत्न केला , डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती घेतले. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या सारख्या समाजसुधारकांनी डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून दलितोध्दारचे कार्य केले. डॉ. अॅनी बेझंट (१८९३)यांनी थिऑसाफिकल सोसायटीच्या माध्यमातून अस्पृता निवारण ,जतिभेद निर्मूलनचे कार्य केले.

डॉ.भाडारकर, दादोबा पांडूरंग ,न्या.रानडे, बाबा पद्मजी,न्या.तेलंग,आगरकर,स्वामी दयानंद सरस्वती,विवेकानंद,देवेद्रनांथ टागोर,ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी समाजसुधारकांनी धार्मिक पुनर्जागरण व समाजप्रबोधनाचे महान कार्य केले.[७]

भारतीय लोकांच्या साठी पाश्चात्य शिक्षण हे एक प्रकरचे वरदान ठरले.अठराव्या शतकात अॅबे कॅरे या खिस्ती मिशनऱ्याने भारतात शिक्षणाला सुरूवात केली.पण खऱ्या अर्थाने इंग्रजी शिक्षणाला चालना लॉर्ड विल्यम बेंटीकच्या काळात मिळाली. भारतीयांना पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण देण्याचे ब्रिटीश सरकारने जाहिर केले. त्या नुसार भारतात अनेक ठिकानी पाश्चात्य शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन झाल्या. या शिक्षणसंस्थेतून ज्ञान ,शिक्षण व कला, पाश्चात्य संस्कृतीची ओळख भारतीयांना होवू लागली.स्पेन्सर,मिल,मेकॉले,बुक,लॉक शेक्सपिअर,जॉन्सन यांच्या विचाराची माहितीही लोकांना पाश्चात्य शिक्षणामुळेच मिळाली. फ्रेंच राज्यक्रांती ,जर्मनी,इटली,ऑस्ट्रीयाचा स्वातंत्र्य लढा , अमेरिकन वसाहतीचा स्वातंत्र्य लढा या सारख्या अनेक घटनांनी भारतीयांची मने भारावून गेली.यातूनच भारतात राजकिय जागृती घडून आली.[८]

वर्तमान पत्रे विचाराच्या प्रसाराचे महत्वाचे साधने समजली जातात.पारतंत्र्याच्या काळात भारतीयांच्या वरील अन्याय अत्याचार व जुलमांना वाचा फोडण्याचे महत्वाचे कार्य वृत्तपत्रांनी केले.भारतात ब्रिटीशांच्या काळात अनेक वृत्तपत्रे चालवली जात होती.लोकमताला योग्य दिशा देण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात.१८७५पर्यंत भारतात विविध भाषांत प्रकाशित होणाऱ्या वृतपत्रांची संख्या ३४७ होती तर १४७ वृत्तपत्रे इंग्रजी भाषेत प्रकशित होत होती. या वृत्तपत्रांची मालकी व संपादन कार्य मध्यमवर्गीय सुशिक्षित तरूणाकडे होते. या वृत्तपत्रांनी ब्रिटीश सरकारच्या भारतातील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य केले व त्यातूनच भारतीयांच्या मध्ये

जागृती निर्माण केली.लॉर्ड लिटनने(१८७८) या वृत्तपत्रांच्या गळचेपीचे धोरण आखल्याने वृत्तपत्रांचे हारण झाल्या मुळे जनतेत असंतोष पसरला होता.[९]

भारतातील साहित्याकांनी सुध्दा राजकिय जागृती निर्माण करण्याचे महान कार्य केले.१९ व्या शतकामध्ये अनेक लेखक व साहित्याकांचा उदय झाला. दीनबंधू मित्र,बंकिमचंद्र चर्टर्जी, लोकमान्य टिळक,रवींद्रनाथ टागोर ,मधुसदन दत्त, नवीनचंद्र सेन, लोकहितादी, चिपळूनकर, परांजपे, इत्यादींच्या लिखाणातून ब्रिटीशांच्या अन्यायाला वेशीवर टांगले. वि.का.राजवाडे, न्या.रानडे , बा.बा.खरे, द.बा.पारसनीय यांनी भारतीयांच्या खऱ्या इतिहास लिखानाचे कार्य केले. या साहितियकांच्या व इतिहासकारांच्या कमिगिरी मुळे सुध्दा जनतेत एकता निर्माण झाली.

१९ व्या शतकामध्ये ब्रिटीशांनी रस्ते,रेल्वे,पोस्ट,तारायंत्रणा या सारखी अनेक प्रकरची भौतिक साधने निर्माण केली.या सुधारणा भारतीयासाठी केलेल्या नव्हत्या तर भारतीयांचे आर्थिक शोषण करणे सोयीचे व्हावे व भारतावर आपली पक्कड घट बसावी या हेतूने केलेल्या होत्या.पण या सुधारणा मुळे भारतात राष्ट्रवाद वाढीस लागला.[१०]

ब्रिटीशांच्या कृषविषयक व व्यापारी धोरणामुळे प्रचिलित समाज व्यवस्थेतबदल होवून जमिनदार,सधन नोकरी, व्यापारी,सावकार आणि विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांचा वर्ग उदयास आला. या नविन वर्गातील तरूणांना नविन ज्ञान,पाश्चात्य शिक्षण व विचार आत्मसात करणे शक्य झाले.पाश्चात्य विचार व संस्कृतिने भारावलेल्या तरूणांनी देशात सुधारणेच्या कार्याचा पाया घातला. या मध्यम वर्गीय तरूणांच्या उदयामुळे भारतात राष्ट्रवादी भावना वाढीस लागली.[११]

मुल्यमापन –

राष्ट्रवादाच्या निर्मिती साठी समान भूप्रदेश,वांशिक एकता ,सांस्कृतिक एकता ,इतिहास,भाषिक एकता ,धार्मिक एकता ,समान आर्थिक हितसंबंध,समान राजकिय महत्वकक्षा इत्यादी घटकामुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागते पण भारताता रूढी,चालीरिती ,परंपरा ,जातिव्यवस्था ,धार्मिक विविधता, सांस्कृतिक विविधता असतानाही १९ व्या शतकामध्ये भारतात ब्रिटीशांच्या धोरणा मुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागलेली दिसून येते.

संदर्भ ग्रंथसूची–


१. सोनवणे, स्नेहल,एन,व इतर,आधुनिक महाराष्ट्र,सेक्सेस पब्लिकेशन,पुणे,२०१४, पृ.१९
२. करंदीकर,ना,स, वासुदेव बळवंत फडके, बोरा अँन्ड कंपनी,मुंबई,१९७२, पृ.२०१
३. सरदार,गं,बा, महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, गं,बा, सरदार शिवाजी नगर, पुणे, १९४१,पृ.४७
४. Ram Gopal , British Rule in India , Asia Publishing House, Bombay ,1963, P,52
५. Roberths,P,E, History of British India , Akshant Publication , Delhi ,1990 ,P,41
६. जाधव,व्ही,के, आधुनिक भारताचा इतिहास,विद्या प्रकाशन ,नागपूर,२००४,पृ.२१२
७. आठल्ये ,विभा,भारताचा इतिहास , अंशुल पब्लिकेशन,नागपूर,२०००,पृ.१२२
८. पवार,जयसिंगराव,हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास , मुंबई ,१९७८, पृ.४०
९. दक्षित,ना,सि,आधुनिक भारत ,नागपूर,२००३, पृ.५०
१०. करंदीकर,ना,स, वासुदेव बळवंत फडके, बोरा अँन्ड कंपनी,मुंबई,१९७२, पृ. २०२
११. डॉ,कटारे,अनिल,भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,प्रशांत पब्लिकेशन,जळगाव ,२०१३,पृ.२२


Scanned with CamScanner